पोलीस अधीक्षक, पुणेग्रामीण यांचेकार्यालय,
चव्हाण नगर, पाषाण रोड पुणे
दुरध्वनी क्रमांक ०२०-२५६५७८७८ / फॅक्स क्र.०२०-२५६७४६४१
ई मेल sp.pune.r@mahapolice.gov.in



जावक क्र. पशा - ११/शा.वा.दुरुस्ती/साहित्य ख.नि. मा./२०२६-२७/पोनि.मोपवि.पु.ग्रा./२०२६ पुणे-८,दि. /०४/२०२६

निविदा जाहिरात - नवीन कामे : वर्षे २०२६-२०२७

पुणे ग्रामीण पोलीस दलाचे कार्यक्षेत्र मोठया प्रमाणावर प्रसरलेले असुन, पुणे ग्रामीणची भौगोलिक परिस्थिती पाहता हद्द खुप लांब पर्यंत विस्तारली असून जिल्हयाच्या चारही बाजुने घाटानी व्यापला आहे. पुणे जिल्हयाला ऐतिहासीक वारसा लाभला असून जिल्हयात विविध धार्मिक स्थळे,पर्यटन स्थळे,मोठया प्रमाणावर आय टी.क्षेत्र, व औद्योगिक वसाहती असुन या जिल्हयामध्ये जिल्हयामधील व जिल्हयाबाहेरील कामासाठी येणारा कामगार वर्ग मोठा आहे. जिल्हयाला शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. येथे शिक्षणासाठी जिल्हयातून तसेच जिल्हयाबाबहेरुन विद्यार्थि शिक्षणासाठी येत असतात. तसेच जिल्यात कायम पायलटींग, एस्कॉर्ट डयुटी, डायल - ११२,जिल्हयाबाहेरील टपाल डयूटी तसेच जिल्हयात अचाणक येणारे व्ही.आय.पी. दौरे व यासाठी लागणारा बंदोबस्त यासाठी वाहनांचा वापर मोठया प्रमाणात होत असतो. त्यासाठी जिल्हयात कायदा व सुव्यवस्था आबादीत राखणेसाठी सतत बंदोबस्त तैनात ठेवावा लागतो. सदर बंदोबस्ताकरीता सुरक्षेच्या दृष्टीने लागणारी शासकीय वाहने हे सुस्थितीत ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठी नादुरुस्त झालेली / होणारी वाहने तात्काळ दुरुस्त करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण घटकाच्या आस्थापनेवरील मोटार परिवहन विभाग,पुणे ग्रामीण येथील शासकीय वाहनांची देखभाल व दुरुस्ती करणेकामी सुटे भाग (साहित्य) खरेदी करणे / वाहनांची दुरुस्ती करणेकामी पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण कार्यालयातर्फे सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता प्रशासकीय सोयीसाठी वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देणे व या कार्यालयाच्या संकेत स्थळावर निविदा मागविणेकामी जाहिरात प्रसिध्द करणे निविदा पध्दतीने इच्छुक पुरवठादार/ दुरुस्तीदार यांचेकडून वाहनांना आवश्यक ते लागणारे सुटे भाग (साहित्य) खरेदी करणे / वाहनांची दुरुस्ती करणेकामी खालील नमूद तपशिलाप्रमाणे निविदाकार यांचेकडून पुढील कामकाजाची किमान दरात **(एका नगाचा दर या प्रमाणे**) नमूद बंद लिफाफ्यात निविदा मागविण्यात येत आहेत.

अ) साहित्य खरेदी : १.) रेडिएटरची कामे (दुरुस्ती,शोल्डरींग,वेल्डींग) खरेदी व दुरुस्ती / २.) ॲक्सेसरिजची खरेदी व दुरुस्ती कामे / ३.) वाहनाची पी.यु.सी. खरेदी / ४.) ऑईल / कॉटनवेस्ट / डिस्ट्रील वॉटर खरेदीची कामे / ५.) शासकिय वाहनांना लाईट, सायरन व पीए सिस्टीम खरेदी करणे / ६.) DPF, EGR, TURBO, SENSOR साहित्य खरेदी करणे / दुरुस्तीची कामे / ७.) सीट कुशनींग साहित्य खरेदी करणे / दुरुस्तीची कामे / ८.) शासकीय वाहनांनसाठी टायर खरेदी करणे / ९.) शासकीय वाहनांना बॅटरी खरेदी करणे / १०.) रेडीयमची साहित्य खरेदी करणे व लेबर चार्ज / ११.) शासकिय फ्लॅग / मोनोग्राम / मोनोग्राम बॉक्स बसविणे साहित्य खरेदी व लेबर चार्ज / १२.) पाटयांची खरेदी व दुरुस्तीची कामे

ब) वाहन दुरुस्तीची कामे : १.) टायर पंक्चर, ओपनिंग फिटींग, व्हील अलायमेंट व बॅलेन्सींग कामे **२.)** मशनिंगची कामे (इंजीन, हेड, इंजीन, ब्लॉक,ड्रम कटिंग इत्यादी), **३.)** वाहनाचे डेंटिंग पेंटिंग व कलरींग कामे,वेल्डींगची कामे **४.)** मॅकेनिक कामे **५.)** ए.सी.दुरुस्तीची कामे **६.)** क्रेन दुरुस्ती इ. **७.)** वाहनांच्या दरवाज्याची दरुस्तीची कामे **८.)** टायर रिट्रेडींग आणि कट दुरुस्ती करीता.

महाराष्ट्र शासन,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस २०२१/प्र.क्र. ८/उद्योग-४,दिनांक ०७ मे, २०२१ अन्वये दरपत्रकाचे आधारे वरील सेवा उपलब्ध करून घेण्यात येणार आहे.

तरी सदर दरपत्रके/ निविदा व स्विकृती उघडण्याची कार्यवाही कालावधी हा पुढीलप्रमाणे राहील.

निविदा फॉर्म/ दरपत्रके सादर करणेची दिनांक :	-	दिनांक ०४/०५/२०२६ सकाळी १०.३० वा ते दिनांक ११/०५/२०२६ दुपारी १५.०० वाजेपर्यत.
निविदा फॉर्म/ दरपत्रके स्विकृतीचा अंतिम दिनांक :	-	११/०५/२०२६ रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यत
निविदा फॉर्म/ दरपत्रके उघण्याचा दिनांक :	-	१३/०५/२०२६ रोजी दुपारी १४.३० वाजता (शक्य झाल्यास)

अ) सदर कामांबाबत निविदा अटी/ शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असुन सदर कामांचे निविदा संच www.puneruralpolice.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

ब) निविदा संच हा शेवटच्या दिवशी प्राप्त न झाल्यास सेवा पुरवठादार/ ठेकेदारांची पुनश्च नव्याने निविदा जाहिरात प्रसिध्द करण्यात येणार नाही. निविदाकार यांनी अंदाजित पुर्व गणित रक्कम दर्शविल्याप्रमाणे लिफाफ्यामध्ये रक्कम कमी दराने रेट कोट करावयाचा आहे. दर्शविलेल्या रक्कमेपेक्षा जादा दराने रेट कोट करण्यात आलेली निविदा बाद समाजवण्यात येईल.

क) महत्वाची सूचना :- सदर कार्यालय कायदा व सुव्यवस्था राखण्याचे अत्यंत महत्वाचे काम करीत असल्यामुळे निविदा उघडणेची तारीख व वेळ कधीही बदल / रद्द / पुढे ढकलण्यात येवू शकते.

ड) सदर निविदेची मुदतवाढ झाल्यास वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाणार नाही. संबधितानी वेबसाईटला भेट देवुन लक्ष दयावे. मागविलेल्या निविदा कोणत्याही स्तरावर कोणतेही कारण न देता रदद करण्याचे अधिकार पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी राखुन ठेवलेले आहेत.

इ) अनुदान अभावी निविदा रदद झाल्यास निविदाकार यांनी सादर केलेली निविदा शुल्क/सादर कागदपत्रे परत करणेबाबत कार्यालय कसल्याही प्रकारची हमी देत नाही.

ई) निविदाकार यांनी बंध लिफाफ्यामध्ये दरकोटेशन लेटर हेड वर दयावे तसेच या निवीदेत सादर करण्यात आलेला (नमुना फॉर्म-१) भरून सादर करणे अनिवार्य राहील. तसेच निविदाकार एल-१ ठरल्यावर नमुना फॉर्म-१ मधील सर्व कागदपत्रांचा संच कार्यालयानी पुरवठा आदेश दिल्यानंतर जमा करावे लागेल.

जी) तरी तांत्रिक दृष्टया पात्र असणा-या निविदाकार दरपत्रके बंद पाकिटात खरेदी समिती समक्ष सादर करणेची दक्षता घ्यावी.

(संदीप सिंह गिल्ल) भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण.

प्रति, सर्व मेसर्स,

प्रत प्रसिध्दीकामी :- पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण
प्रत माहितीस्तव : पो.नि.मोटार परिवहन विभाग,पुणे ग्रामीण

(नमुना फॉर्म-१)

१	निविदाकार कंपनीचे पूर्ण नाव व पत्ता दूरध्वनीसह	
२	निविदाकार कंपनीचे व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक (Company incorporation / Shop Act No.)	
३	निविदाकार कंपनीचे / मालकाचे PAN Card / TAN Card. क्रमांक	
४	निविदाकार कंपनीचे GST Registration Certificate. क्रमांक	
५	निविदाकार कंपनी किंवा त्यांचे मालक / संचालक / भागीदार व त्यांचे जवळचे नातेवाईक यांच्यावर कोणत्याही सरकारी किंवा निमसरकारी कार्यालयामध्ये फ़सवणुकीची / गैरप्रकाराची किंवा भ्रष्टाचाराची कोणतीही चौकशी चालू / प्रलंबित नसली पाहिजे. तसेच निविदाकार कंपनीचा समावेश सरकारी काळ्या यादीत नसला पाहिजे. अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र **कंपनीच्या लेटर हेडवर** देणे बंधनकारक आहे. (सोबत नमुना परिशिष्ट - ०१)	
६	निविदाकार कंपनीचे मालक / संचालक / भागीदार व त्यांचे जवळचे नातेवाईक उदा. आई, वडील, भाऊ, बहीण, पत्नी, पती, मुलगा, मुलगी यांच्या नावावर दोन किंवा जास्त समान व्यवसाय करणाऱ्या स्वतंत्र अथवा भागीदारीमध्ये वेग वेगळ्या कंपन्या रजिस्टर / नोंदणीकृत असल्यास सदर कंपनी व मूळ कंपनी अशा दोन किंवा जास्त निविदा सादर करता येणार नाहीत. तसेच अशा प्रकारच्या दोन किंवा जास्त निविदा एकाच वेळी व एकाच निविदेसाठी इतर कोणत्याही शासकीय कार्यालयात सादर केल्या असतील व तसे करुन मूळ कंपनीच्या नावावर काम घेतले असेल किंवा नसेल, अशा कंपन्यांना साखळी करुन (Ring) निविदा प्रक्रिया केली, असे संबोधले जाईल व अशा कंपन्यांच्या निविदा रद्द करण्यात येतील. निविदा सादर करणाऱ्या सर्व निविदाकारांनी स्वतःचे प्रतिज्ञापत्र सोबत जोडलेल्या नमुन्या प्रमाणे **कंपनीच्या लेटर हेडवर** देणे बंधनकारक आहे. (सोबत नमुना परिशिष्ट - ०२)	
७	(उदा. 2023-24, 2024-25, 2025-26) प्रपत्र-३ प्रमाणे चार्टर्ड अकाउंटंट यांचे प्रमाणित केलेले मागील 3 आर्थिक वर्षांतील आयकर रिटर्न आणि UDIN क्रमांकासह चार्टर्ड अकाउंटंट ने प्रमाणित केलेले	

सही :-

(कंपनीचा शिक्का)

निविदाकार कंपनीचे मालक / भागीदार / संचालक

***** **कंपनीच्या लेटर हेडवर** *****

(१) **परिशिष्ट** - 1

(मालकाचे / भागीदार / संचालक यांचे प्रतिज्ञापत्र)

प्रतिज्ञापत्र

मी / आम्ही ---------- (मालकाचे / भागीदारांचे / संचालकांचे नाव व पत्ता) ---------- पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या मोटार परिवहन विभाग,पुणे ग्रामीण येथील कर्तव्यावर असलेल्या शासकीय वाहनांच्या देखभाल व दुरुस्तीकरीता वाहनांना आवश्यक ते लागणारे सुटे भाग (साहित्य) सेवा पुरवठा करणे / वाहनांची दुरुस्ती करणेकामी सेवा पुरवठा करणेबाबत निविदा ---------- ही सुटे भाग (साहित्य) / वाहनांची दुरुस्ती करणेकामी सेवा पुरविणेकामी (निविदाकार कंपनीचे नाव व पत्ता) ---------- नावाने भरत आहोत.

मी / आम्ही तसेच माझी कंपनी यांचे विरोधात कोणत्याही सरकारी कार्यालयामध्ये निविदा भरण्याच्या दिनांक- 04/05/2026 रोजी पर्यंत कोणतीही गैरप्रकार, अफरातफर गैरव्यवहार, फसवणूक तसेच भ्रष्टाचार या विषयी कोणतीही चौकशी चालू नाही किंवा प्रलंबित नाही.

तसेच अशा प्रकारची कोणतीही चौकशी माझे / आमचे जवळचे नातेवाईक (आई / वडील / बायको / नवरा / भाऊ / बहीण) यांचे विरोधात सुध्दा चालू नाही.

सही :-

निविदाकार कंपनीचे मालक / भागीदार / संचालक

***** **कंपनीच्या लेटर हेडवर** *****

(२) परिशिष्ट - 2

(मालकाचे / भागीदार / संचालक यांचे प्रतिज्ञापत्र)

प्रतिज्ञापत्र

मी / आम्ही ---------- (मालकाचे / भागीदारांचे / संचालकांचे नाव व पत्ता) ---------- पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या मोटार परिवहन विभाग,पुणे ग्रामीण येथील कर्तव्यावर असलेल्या शासकीय वाहनांच्या देखभाल व दुरुस्तीकरीता वाहनांना आवश्यक ते लागणारे सुटे भाग (साहित्य) सेवा पुरवठा करणे / वाहनांची दुरुस्ती करणेकामी सेवा पुरवठा करणेबाबत निविदा ---------- ही सुटे भाग (साहित्य) / वाहनांची दुरुस्ती करणेकामी सेवा पुरविणेकामी (निविदाकार कंपनीचे नाव व पत्ता) ---------- ---------- नावाने भरत आहोत.

मी / आम्ही सदर कंपनीचे संचालक असून आमच्या संचालकांच्या जवळच्या नातेवाईक (मालक / संचालक व त्यांचे जवळचे नातेवाईक उदा. आई, वडील, भाऊ, बहीण, पत्नी, पती, मुलगा, मुलगी) यांच्या नावावर दोन किंवा जास्त समान व्यवसाय करणाऱ्या स्वतंत्र अथवा भागीदारीमध्ये वेग वेगळ्या कंपन्या रजिस्टर आहेत / नाहीत. (असल्यास त्यांची नावे देण्यात यावीत.)

तसेच सदर दोन किंवा त्यापेक्षा जास्त असणाऱ्या कंपन्यांनी मिळून कोणत्याही एका शासकिय निविदा प्रक्रियेमध्ये एकत्र सहभाग नोंदविलेला नाही. तसेच अशा प्रकारचे कोणतेही शासकीय काम घेतलेले नाही. अशा प्रकारची तक्रार आढळून आल्यास मला व माझ्या कंपनीला सदर निविदा प्रक्रियेमधून रद्द करण्यात येईल, याची मला जाणीव आहे.

सही :

निविदाकार कंपनीचे मालक / भागीदार / संचालक